- Greenberger, M. (2002). Nation's high schools still operate "separate and unequal" vocational education for male and female students. Retrieved June 12, 2002, from http://www.nwlc.org/details.cfm?id=1135&section=education
- Harris, B., & Jones, S. (1997). The parent's crash course in career planning. Lincolnwood, IL: VGM Career Horizons.
- Heyde, M., & Jordaan, J. (1979). Vocational maturity during the high school years. New York, NY: Teachers College Press, Columbia University.

- Imel, S. (1996). Tech prep, trends and issues alert. ERIC/ACVE Publication. Retrieved June 18, 2002, from http://www.ericacve.org/docgenasp?tbl=tia&ID=103
- Rawe, J. (2002). Young & jobless. Time.com: Time Magazine, 159 (23). Retrieved June 17, 2002, from www.time.com/time/magazine/printout/0,8816,257139,00.html
- Wonacott, M. (2002). High schools that work: Best practices for CTE. ERIC Practical Application Brief No.19. Retrieved June 18, 2002, from http://www.ericava.org/docgen.asp?tbl=pab&ID=109

''केतकावळे गावाचा शेतीपूरक व्यवसायाचा आर्थिक आणि सामाजिक प्रगतीचा अभ्यास''

प्रा. अक्षय विपीनचंद्र उगीले
वाणिज्य विभाग

संशोधन परिचय :

केतकवळे हे भारतातील महाराष्ट्र राज्यातील पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील एक गाव आहे. हे उपजिल्हामुख्यालय सासवडपासून १२ किमी अंतरावर आहे. केतकवळे हे महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील एक मध्यम आकाराचे गाव असून येथे एकूण २७५ कुटुंबे राहतात. केतकवळे गावाची लोकसंख्या १२५० असून २०११ च्या जनगणने नुसार ६२७ पुरुषतर ६२३ स्त्रिया आहेत. महाराष्ट्राच्या तुलनेत केतकावळे गावात साक्षरतेचे प्रमाण कमी आहे. २०११ मध्ये केतकवळे गावचा साक्षरतेचा दर ८१.८८% होता, तर महाराष्ट्राचा साक्षरतादर ८२.३४% होता. केतकावळे येथे पुरुष साक्षरता ९०.४८% तर स्त्री साक्षरता ७३.४८% आहे.

संशोधन विधान:

केतकवळे गावाचा शेतीपूरक व्यवसायाचा आर्थिक आणि सामाजिक प्रगतीचा अभ्यास.

संशोधनाची उद्दिष्टे :

- केतकवळे गावातील शेतीपूरक व्यवसायाची माहिती अभ्यास करणे.
- केतकवळे गावातील गाव कऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करणे.
- केतकवळे गावातील गाव कऱ्यांच्या सामाजिक प्रगतीचा अभ्यास करणे.

गृहीतके:

- कृषी पूरक व्यवसायामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीमध्ये सुधारणा होते.
- कृषी पूरक व्यवसायासाठी शासन करीत असलेल्या मदतीचा सर्व शेतकऱ्यांना लाभ मिळत नाही.

संशोधनाची गरज:

भारत हा कृषिप्रधान देश असून भारतातील ७० टक्के जनता शेतीवरच अवलंबून आहे. भारतीय शेतकरी हा अशिक्षित असून त्यांची शेती करण्याची पद्धत ही परंपरागत आहे त्यामुळे त्यांच्या शेतीची उत्पादकता कमी असल्याचे आपणास दिसून येते. भारतीय शेतकरी हा परंपरेने शेती करीत असताना तो व्यवसायिक दृष्टीने आजही शेतीकडे पाहत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न कमी असून त्यांची आर्थिक परिस्थिती बेताची

असल्याची आपणास दिसून येते. जी परिस्थिती भारतात, महाराष्ट्रात आहे तीच परिस्थिती पुणे जिल्ह्यातील केतकावळे गावात असल्याचे दिसून येते. आज काही शेतकरी शेतीपूरक व्यवसायाकडे वळत आहेत, ज्यामुळे त्यांच्या आर्थिक उन्नती मध्ये वाढ होताना दिसून येत आहे तेव्हा अशा शेतीपूरक व्यवसायामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नती मध्ये वाढ होत आहे का? शेतीपूरक व्यवसायाचे कसे महत्त्व आहे हे इतर शेतकऱ्यांच्या समोर आणून त्यांना शेतीपूरक व्यवसायाकडे कसे वळवता येईल याचा प्रयत्न या संशोधनाच्या माध्यमातून येथे करण्यात येणार आहे.

संशोधनाचे महत्त्व:

शेती हे भारतीय अर्थव्यवस्थेतील एक महत्त्वाचे क्षेत्र आहे. देशातील सुमारे ५९ टक्के लोकसंख्या शेती क्षेत्रावर प्रत्यक्षपणे अवलंबून आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत शेती व्यवसायाचे महत्त्व अन्नधान्य पुरवठा उद्योगधंद्यांना लागणारा कच्चा व आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या दृष्टीने अनन्य साधारण असे आहे. भारतात सर्वात जास्त रोजगार उपलब्ध करून देणारा व्यवसाय म्हणजे शेती होय परंतु भारतातील शेती ही मोसमी पावसावर अवलंबून असल्यामुळे कधीही जास्त पावसामुळे शेतीचे नुकसान होते तर कधी कमी पावसामुळे शेतीचे नुकसान होते त्यामुळे शेतकरी हा आर्थिक संकटात सापडतो व त्याच्या दैनंदिन गरज सुद्धा तो पूर्ण करू शकत नाही. शेती या व्यवसायावर जास्त लोक अवलंबून असल्यामुळे त्याही लोकांना या दुष्काळाची झळ नेहमी पोहोचत असल्याचे दिसून येते. शेतकरी हा केवळ शेतीवरच अवलंबून न राहता इतरही शेती पूरक व्यवसाय केला पाहिजे ज्यामुळे त्यांना अशा संकटाचा सामना करणे कठीण जाणार नाही, आज शेतकरी विविध शेतीपूरक व्यवसायांकडे वळत आहे त्याचा फायदा ही त्या लोकांना होत आहे. तेव्हा या शेतीपूरक व्यवसायामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नती मध्ये कशा पद्धतीने सुधारणा होत आहे हे शोधण्याचा प्रयत्न या संशोधनाच्या माध्यमातून करण्यात आला आहे शेती पूरक व्यवसाय शेतकऱ्यांना कशा पद्धतीने फायदेशीर ठरते व त्यामुळे त्यांचे आर्थिक प्रगती कशाप्रकारे होऊ शकते हे या संशोधनातून अभ्यासण्यात आले आहे.

संशोधनाची मर्यादा:

प्रस्तुत संशोधनामध्ये केतकवळे गावाचा शेतीपूरक व्यवसायाचा आर्थिक आणि सामाजिक प्रगतीचा अभ्यासया विषयाचा अभ्यास करत असताना पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील केतकवळे या गावा पुरते मर्यादित संशोधन करण्यात आले आहे.

संशोधन पद्धती:

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक सामग्रीचा आधार घेण्यात आला आहे. प्राथमिक साधनांमध्ये प्रत्यक्ष शेतीपूरक व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांकडे जाऊन अनुसूचीच्या सहाय्याने माहिती संकलित करण्यात आली आहे.

क्रमांक	प्रश्नाचे स्वरूप	हा	नाही	हा	नाही
१	हंगामी स्वरूपाचे शेतीचे उत्पन्न	९२	५	९४.८५%	५.१५%
२	शेतीपूरक व्यवसायामुळे आर्थिक प्रगती	६७	३०	६९.०७%	३०.९३%
३	आर्थिक प्रगतीमुळे सामाजिक समतोल	५८	३९	५९.७९%	४०.२१%
४	सामाजिक व आर्थिक जीवनमान	६०	३७	६१.८६%	३८.१८%

निष्कर्ष:

- केतकावळे गावातील शेतीचे उत्पन्न हे ९४.८५% हंगामी स्वरूपाचे घेतले जाते, कारण बारमाही पाणी उपलब्ध नाही.
- शेतीपूरक व्यवसायामुळे ६९.०७% आर्थिक प्रगती साधली जात आहे.
- आर्थिक प्रगती मुळे ५९.७९% सामाजिक समतोल साधला जात आहे.
- ६१.८६% नोकरी व पूरक व्यवसायामुळे सामाजिक व आर्थिक जीवनमान हे काळानुसार उंचावत आहे.

''केतकावळे गावातील हवामान बदलाचा शेती क्षेत्रावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास''

प्रा. खरात प्रज्ञा दगडू **प्रा. पोतदार पी. आर.**

अर्थशास्त्र विभाग

प्रस्तावना:

जगातल्या अनेक देशासमोर हवामान बदल हे मोठे आव्हान आहे. हवामान बदल आणि हवामानातीलविचलन याचा वनस्पती, प्राणी, नैसर्गिक साधनसंपत्ती यावर तसेच मानवी जीवनावर परिणाम होत आहे. प्रदेशानुसार आणि काळानुसार हवामानात बदल होत असतो. वातावरण नेहमी अस्थिर आणि क्षोभ निर्माण करणारे असल्यामुळे हवा आणि हवामानाच्या स्थितीत भिन्नता निर्माण होते आणि हवामान बदल घडून येतो.तापमानात वाढ होणे, ऋतुचक्र बदलणे, त्यामध्ये अनियमितता निर्माण होणे यासंबंधी हवामान बदल ही संकल्पना संबंधीत आहे. जागतिक तापमानवाढ ही हवामान बदलाचा स्पष्ट जाणवणारा परिणाम आहे.

सन १९८० नंतर किमान सहा वेळा उबदार तापमानाची वर्षे अनुभवण्यात आली. जगातील शास्त्रज्ञ आय.पी.सी.सी.च्या माध्यमातून स्पष्ट करतात की, हवामान बदल रोखणे आणि समायोजन दोहोंवर तेवढाच भर दिला तर आपत्तीपासून होणारी हानी कमी करता येईल. हवामान बदलला सामोरे जाण्यासाठी त्याचे एक विशेष खाते असणे गरजेचे आहे. जागतिक हवामान बदल होत आहेत असा पर्यावरणवाद्यांचा कयास होता. इंटरनॅशनल पॅनल क्लायमेट चेंजच्या अहवालाने जगातील १३०० वैज्ञानिकांनी जागतिक हवामान बदलाचा सखोल अभ्यास केला. संयुक्तराष्ट्र संघाशी असणाऱ्या या समितीचा पाचवा अहवाल मार्च २०१४ मध्ये प्रसिद्ध झाला. त्यात त्यांनी जगाला इशारा दिला की, हवामान बदलाचा धोका जगातील सर्वाना सारखाच आहे. तेव्हा हवामान बदलाचे धोके लक्षात घेऊन त्यांच्याशी जुळवून घेत शेतीचे नियोजन व समायोजन करणे गरजेचे आहे.

भारतीय अर्थव्यवस्था कृषिप्रधान असून शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. पर्जन्यवृष्टीच्या बदलेल्या स्वरूपाचा परिणाम भारतीय शेती क्षेत्रावर पाहायला मिळतो. कारण भारतीय शेती क्षेत्र हे त्या त्या भागातील हवामानाच्या स्थितीवर आधारित आहे. हवा म्हणजे कोणत्याही एका विशिष्ट ठिकाणची विशिष्ट वेळेची हवामानाची स्थिती होय. पावसाळा काही वर्षी खूपच अधिक तर काही वर्षी खूपच कमी अथवा कोरडा झाल्याने पिकांच्या वाढीवर परिणाम झाला आहे. बदलत्या हवामानाचा परिणाम म्हणजे पर्ज्यन्याची तीव्रता वाढली व त्यामुळे पावसाचे दिवस कमी झाले. हवामान बदलाचा परिणाम पावसाळ्यात दुष्काळ किंवा अतिवृष्टी आणि महापूर, हिवाळ्यात ढगाळ हवामान आणि अवकाळी पाऊस तर उन्हाळ्यात गारपीट होते. त्याचा परिमाण त्या त्या हंगामातील पिके आणि पीक पद्धतीवर होतो. भारतासारख्या कृषिप्रधान देशात तर हवामानशास्त्र व शेती यांचा घनिष्ट संबंध आहे. पिकांची पेरणी, मशागत, मळणी यासाठी हवामानाच्या ज्ञानाची नितांत आवश्यकता असते. कोणत्या हंगामात कोणती पिके घ्यावी, गारपीट, धुके, आवर्षण, अतिवर्षण अशा

परीस्थितीत कोणत्या उपाययोजना कराव्यात, यासाठी हवामानशास्त्राची मदत घेतली जाते. तसेच हवामानाच्या पुर्वानुमानामुळे (Weather forecasting) शेती क्षेत्रातील होणारी हानी टाळता येणे शक्य झाले आहे.

प्रस्तुत संशोधन पुरंदर तालुक्यातील केतकावळे गावातील असून येथील सर्वसाधारण हवामान उष्ण व कोरडे आहे. हवामानातील बदलानुसार प्रत्येक वर्षात मुख्यत: तीन ऋतू असतात. मार्च ते मे पर्यंत उन्हाळा, जून ते ऑक्टोबर पर्यत पावसाळा आणि नोव्हेंबर ते फेब्रुवारी पर्यंत हिवाळा असतो. तालुक्यातील वार्षिक सरासरी पर्ज्यन्यमान ५०० मिमी पर्यंत असते.

हवामानशास्त्राची व्याख्या:

हवामानशास्त्रास इंग्रजीमध्ये 'Climatology' असे म्हटले जाते. शब्दांच्या उत्पती शास्त्रानुसार ग्रीक भाषेतील 'Klima' क्लाइमा या शब्दाचा अर्थ म्हणजे पृथ्वीचा उतार होय. ॲरिस्टॉटलनेक्लाइमाचा उपयोग अक्षवृत्त म्हणून केला होता. पृथ्वी गोलाकार असल्याने अक्षवृत्तानुसार हवामान बदलते. म्हणून 'Klima' क्लाइमा म्हणजे बदलते हवामान व Logos लोगस म्हणजे अध्ययन किंवा शास्त्र होय. म्हणून Klima + Logos = Climatology क्लाईमॅटोलॉजी म्हणजे पृथ्वीवरील बदलत्या हवामानाचे अध्ययन किंवा शास्त्र होय. क्लाइमा या शब्दावरूनच क्लाएमेट हा इंग्रजी शब्द हवामानासाठी प्रचलित आहे.

१) **कोपेन व डीलॉग व्याख्या :**

हवामान व त्याची विविध अंगे त्यांच्या वितरणावर परिणाम करणारे घटक तसेच प्रत्यक्ष त्या घटकांचे प्रादेशिक वितरण स्पष्ट करणे म्हणजे हवामानशास्त्र होय.

२) **डब्लू.जी.मूर व्याख्या:**

पृथ्वीवरील विविध प्रकारचे हवामान व त्यांचा नैसर्गिक पर्यावरणावर होणारा परिमाण यांचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे हवामानशास्त्र होय.

संशोधन पद्धती:

प्रस्तुत संशोधन हे पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील केतकावळे गावातील संशोधन विषयाच्या अनुषंगाने निवडले आहे. प्रस्तुत संशोधन प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांद्वारे माहितीचे संकलन केले आहे.

संशोधन अभ्यासाची उद्दिष्टे आणि ध्येय:

१) केतकावळे गावातील हवामान बदलाचा शेतकऱ्यांच्या आर्थिक जीवनावर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.

२) केतकावळे गावातील पीक रचनेत झालेल्या बदलाचा अभ्यास करणे.

३) केतकावळे गावातील हवामान बदलाचा शेती उत्पादनावर व उत्पन्नावर झालेला परिणाम अभ्यासणे.

प्राथमिक स्त्रोत:

मुलाखत अनुसूची, निरीक्षण, चर्चा इत्यादींच्या माध्यमातून केतकावळे गावातील हवामान बदलाचा परिणाम शेती क्षेत्रावर व शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीचा अभ्यास केला आहे.

दुय्यम स्त्रोत:

प्रस्तुत संशोधन विषयाची अधिक माहिती मिळविण्यासाठी शोधनिबंध, प्रबंध, संदर्भ पुस्तके, वेबसाईट इत्यादींचा वापर केला आहे.

मर्यादा :

प्रस्तुत संशोधन विषयाची मर्यादा पुरंदर तालुक्यातील केतकावळे गावातील शेतकऱ्याच्या अभ्यास विषयापुरती मर्यादित आहे.

निरीक्षण आणि सर्वेक्षणातील मुद्दे :

१) केतकावळे गावातील २०११ च्या लोकसंख्या जनगणनानुसार एकूण १२५० लोकसंख्या होती पुरुषांची लोकसंख्या ६२७ तर स्त्रियांची लोकसंख्या ६२३ होती.

२) केतकावळे गावातील २०११ च्या लोकसंख्या जनगणनानुसार एकूण लोकसंख्येपैकी ९०४ लोक साक्षर आहेत. ४९४ पुरुष साक्षर आहेत तर ४१० स्त्रिया साक्षर आहेत. ३४६ लोक निरक्षर आहेत १३३ पुरुष तर २१३ स्त्रिया निरक्षर आहेत.

३) केतकावळे गावातील शेतीचे क्षेत्र ४८३ हेक्टर असलेले दिसते.

४) केतकावळे गावात ६०% लोकसंख्या शेती हा प्रमुख व्यवसाय करतात. व्यवसाय करणारे २५% लोकसंख्या आहेत. नोकरी १५% लोकसंख्या करतात असे दिसते.

५) केतकावळे गावातील शेतीचे उत्पादन ६२% पावसाच्या पाण्यावर अवलंबून असलेले दिसून आले. विहिरीच्या पाण्यावर २३%, बोअरवेल व इतर पाण्यावर १५% शेतीचे उत्पादन अवलंबून असलेले दिसते.

६) केतकावळे गावातील ५५% शेतकरी हवामानानुसार पीक नियोजन करतात. इतर ४५% शेतकरी हवामानानुसार पीक नियोजन करत नाही असे दिसून आले.

७) केतकावळे गावातील शेतीचे तुकडे झालेले दिसून आले, ५७% शेतकरी हे कमी धारणक्षेत्र असलेले दिसतात त्यांच्याकडे २.५ एकर पेक्षा कमी शेती असलेली दिसते.

८) केतकावळे गावातील शेतकरी ज्वारी, बाजरी, भात शेती, मका, अंजीर, पेरू इत्यादी पिके घेतात्त.

९) जानेवारी २०२० दुष्काळानंतर पावसाने चांगली साथ दिली परंतु त्यामुळे रब्बी हंगामात डोंगराळ व जिरायत भागात ज्वारीची लागवड करण्यात आली. मात्र हवामानातील बदलामुळे त्यावर रोगाचा प्रादुर्भाव झाला.

१०) पुरंदर तालुक्यात अंजीर या फळाचे उत्पादन घेतले जाते. हवामान बदलामुळे अंजीरचे पीक आर्थिकदृष्ट्या अडचणीत सापडले आहे असे दिसून आले. त्या तुलनेत देखभाल खर्च कमी, व्यवस्थापनेला सोपे असलेल्या पेरू पिकाचा हुकमी पर्याय शेतकऱ्यांना सापडलेला आहे. तसेच मुंबईचे मार्केट उपलब्ध झाल्याने पेरू उत्पादकांची सोय होत असलेली दिसते.

११) अंजीर उत्पादनाला पर्यायी पीक बदल पेरूच्या पिकात झालेले दिसते.

१२) २०१९ च्या अतिवृष्टीमुळे पिकाचे नुकसान झालेले. २०२० मध्ये पावसाने साथ दिलेली परंतु ज्वारीच्या पिकावर तांबोरा व चिकटा रोगांचा प्रादुर्भाव झाल्याने पीकाचे नुकसान झाले. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झालेले दिसून येते.

निष्कर्ष:

- बदलत्या हवामानामुळे या भागातील कृषी उत्पादनात घट होत आहे असे दिसून आले.
- पावसाळा लांबलेला यामुळे बहुतेक वेळा दुबार पेरणीची वेळ येते. म्हणून शेती करणे परवडत नाही.पीक भरघोस येत नाही असा परिणाम दिसून येतो.
- केतकावळे गावात ज्या ठिकाणी पाणी मुबलक प्रमाणात आहे तेथे पाण्याचे योग्य नियोजन नाही असे दिसते.
- अवकर्षण आणि अवकाळी पावसाविषयी सरकारी योजना राबवल्या जातात त्याविषयी शेतकऱ्यांना कोणतीही माहिती उपलब्ध नाही असे दिसून आले.

शिफारशी:

हवामान बदलाचा समर्थपणे सामना करण्यासाठी काही शिफारशी सुचविता येतील.

- कृषी संशोधनाची दिशा बदलने गरजेचे आहे. २००३ पासून पावसाचे अंदाज वर्तविले जात आहेत. पण ते पुरेसे नाही.
- संरक्षित शेती करणे गरजेचे आहे. कमीत कमी नुकसान होणाऱ्या पिकांच्या उत्पादनाची आखणी करावी.
- स्थानिक पातळीवर जलव्यवस्थापन केले जावे ज्यामुळे भूजलपातळीव पावसाच्या पाण्याचे नियोजन करता येईल.
- पाणलोट विकास व तंत्रज्ञानातून हवामान बदलावर मात करता येणे शक्य आहे. ज्यामुळे भाजीपाला लागवड करता येईल.
- स्वयंचलित हवामान यंत्रांची मोठ्या प्रमाणातगरज आहे. साबळे मॉडेल, किसान पोर्टेल याप्रमाणे यंत्रे विकसित केली जावी.
- हवामान बदलाचे गांभीर्य लक्षात आणून देण्यासाठी सामान्यजनांपर्यंत त्यांचे दुष्परिणाम व उपाययोजना पोहचविण्यात याव्या.

वरील सर्व उपायांची अंमलबजावणी केल्यास काही प्रमाणात का होईना हवामान बदलांचा सामना करणे शक्य होईल व ग्रामीण अर्थव्यवस्थेला हवामान बदलांच्या धोक्यापासून सुरक्षित ठेवता येईल. ग्रामीण क्षेत्रे सुरक्षित तर देश सुरक्षित व अर्थव्यवस्था सुरक्षित राहील.

संदर्भसूची:

१. आय.पी.सी.सी. अहवाल-२०१२

२. आगलावे प्रदीप, संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्र, विद्या प्रकाशन नागपूर.

३. कृषी भूगोल (gricultural Geography) - डॉ.अरुण राजाराम कुंभारे पायल पब्लिकेशन, पुणे.

४. जागतिक हवामान बदल अहवाल - २०१२

५. अशाश्वताच्या समशेरीवर भारतातील हवामान बदल : अपाय आणि उपाय - संतोष शिंत्रे, पुणे.

६. हवामानशास्त्र (Climatology)- डॉ.डी.एच.चौधरी, डॉ.सतीश जाधव चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.

७. www.wikipedia.climatechange

८. www.vikaspedia.com

''केतकावळे गावातील महिलांचा राजकीय प्रक्रियेतील सहभाग''

प्रा. गायकवाड शीतल सदाशिव
राज्यशास्त्र विभाग

आजच्या आधुनिक जगात लोकशाही ही सर्वात लोकप्रिय शासनपद्धती म्हणून ओळखली जाते. भारताची ओळखही जगातील एक मोठा लोकशाही देश म्हणूनच करून दिली जाते. लोकशाहीची भारतातील प्रक्रिया जरी ब्रिटिशांच्या काळातच सुरू झालेली असली तरी तिचा खऱ्या अर्थाने प्रारंभ १९४७ नंतरच झाला.राजकीयदृष्ट्या लोकशाहीधारक बनल्यानंतर भारताची सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीच्या दिशेने वाटचाल सुरु झाली.

राजकीय लोकशाही स्थापनेचा महत्वाचा निकष म्हणजे निवडणुकीच्या प्रक्रियेत (प्रतिनिधित्व आणि मतदान) सहभागी होण्याचा सर्वांना समान हक्क (कोणत्याही भेदभावाशिवाय) देणे होय. राजकीय सहभागाची सर्वांना समान संधी उपलब्ध करून देणे होय. सामाजिक आणि आर्थिक लोकशाही म्हणजे या राजकीय हक्कांचा वापर करता येईल अशी सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती निर्माण करणे होय. आपण राजकीय लोकशाही स्वीकारली आहे पण राजकीय लोकशाही टिकवण्यास हातभार लावणाऱ्या सामाजिक आणि आर्थिक लोकशाही निर्मितीत यशस्वी ठरलो आहोत का हे पाहणे ही अत्यावश्यक ठरते. लोकशाहीचे यश आणि अपयश तपासण्यासाठी लोकशाहीच्या राजकीय, आर्थिक, सामजिक आयामांचा अभ्यास करणेही आवश्यक ठरते.

या संशोधन लेखात याच सामाजिक लोकशाहीच्या अनुषंगाने पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील 'केतकावळे गावातील महिलांचा राजकीय प्रक्रियेतील सहभाग' या विषयावर संशोधन करण्याचा प्रयत्न केला आहे. यात गावातील स्थानिक राजकारण, प्रादेशिक, देशीय राजकारण, निवडणूक प्रकियेत महिलांच्या सहभागाचे प्रमाण कसे आहे, महिला सहभागास आवश्यक पोषक परिस्थिती उपलब्ध आहे का ? ती असल्यास किंवा नसल्यास त्या मागे कोणती कारण आहेत, हे शोधण्याचा प्रयत्न प्रस्तुस्त अभ्यासात केला गेला आहे. या संशोधनासाठी सामाजिक सर्वेक्षण, वर्णनात्मक आणि गुणात्मक, तुलनात्मक आणि विश्लेषणात्मक संशोधन पद्धतींचा अवलंब करण्यात आला आहे. हे संशोधन स्त्रीवादी परिप्रेक्ष्यातून करण्याचा प्रयत्न केले आहे. संशोधनाचा प्रमुख हेतू केतकावळे गावातील राजकीय प्रक्रियेतील महिलांच्या सहभागाचा चिकित्सक अभ्यास हा होता. माहितीचे संकलन करण्यासाठी प्राथमिक स्त्रोत (निरीक्षण, मुलाखत, प्रश्नावली) व दुय्यम स्त्रोत (विविध शासकीय निर्णय, वृत्तपत्रीय लेख, स्त्री प्रश्न हाताळणारी मासिके, पुस्तके) यांचा वापर केला आहे.

लोकशाही संकल्पनेच्या दिवसोंदिवस होत असलेल्या विस्तारामागे लोक या संकल्पनेचा झालेला विकास कारणीभूत ठरला आहे. पूर्वी लोक ही संकल्पना समाजातील उच्च वर्गीय आणि ते ही पुरुष यांच्यापुरतीच सीमित होती. कालानुरूप तिचा विस्तार होत जाऊन त्यात कृष्णवर्णीय, गुलाम, कनिष्ठ जाती म्हणजे दलित व आदिवासी, महिला अशा अनेक वंचित घटकांचा समावेश झाला. त्यांच्या हक्कांविषयीही बोलले जाऊ लागले. भारताने स्वातंत्र्य प्राप्तीनंतर पुरुषांप्रमाणेच महिलांनाही सर्व राजकीय हक्क कोणतीही खळखळ न करता मिळवून

देण्याचे धोरण अंगिकारले. प्रत्यक्षात हा हक्क स्त्रियांना किती प्रमाणात वापरता येतात याचा शोध घेतल्यास आपल्याला नकारात्मक परिस्थितीच दिसून येतो. अशी स्थिती उद्भवण्यास भारतीय समाजाची पितृसत्ताक मानसिकता कारणीभूत असल्याचे दिसून येते. पितृसत्ता समाजातील सर्व संसाधनांची मालकी पुरुषांनाच देते. समाजातील सर्व संस्था ही पितृसत्ताक संस्कृतीच्या वर्चस्वाखाली काम करताना दिसून येतात. यामुळेच हक्क मिळूनही स्त्रियांना हक्कांचा वापर करणे किंवा उपभोग घेणे शक्य होत नाही.

केतकावळे हे गाव पुणे जिल्ह्यातील पुरंदर या तालुक्यात डोंगराच्या कुशीत वसलेले आहे. या गावातील एकूण घरांची संख्या २७५ असून गावाची एकूण लोकसंख्या १२००–१३०० च्या आसपास आहे. महिला व पुरुषांचे प्रमाण या गावात सम असल्याचे दिसते. संख्यात्मकदृष्ट्या महिला या जरी पुरुषांच्या बरोबरीने असल्या तरी राजकीय प्रक्रियेतील त्यांचा सहभाग हा पुरुषांच्याबरोबरीने असल्याचे दिसून येत नाही.

या गावाच्या राजकीय प्रक्रियेतील सहभाग लक्षात घेता असे दिसून आले की, एकंदरीत सर्वच लोकांचा राजकीय सहभाग हा फारच मर्यादित स्वरूपाचा आढळून आला आहे. राजकीय सहभाग हा समाजात सतत व विविध पातळ्यांवर घडून येत असतो. त्यात निवडणुका, मतदान, राजकीय प्रश्नांवरील चर्चा, निषेध मोर्चे, राजकीय सभा, संमेलने, मेळावे, आंदोलने अशा अनेक कृतींचा त्यात समावेश होतो. परंतु या गावातील राजकीय सहभाग हा निवडणुक राजकारणाच्या चौकटीतच आकाराला आल्याचे दिसून येते. त्यातल्या त्यात महिलांचा राजकीय सहभाग तर फक्त मतदानापुरताच मर्यादित असल्याचे दिसून येते. सामाजिक सर्वेक्षणाच्या माध्यमातून केतकावळे गावातील सामाजिक, राजकीय प्रक्रियेचा अभ्यास करताना महिलांना प्रश्नावलीतील प्रश्न विचारून त्यांच्या उत्तरांच्या आणि वर्तनाच्या अभ्यासातून त्यांच्या राजकीय सहभागाची व्याप्ती समजून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.त्यातून जे निष्कर्ष पुढे आले आहेत ती पुढीलप्रमाणे:

१. गावातील सर्व महिला अगदी न चुकता मतदानास जातात, पण आपण कोणाला मतदान करावे, का करावे, कशासाठी करावे याचा निर्णय त्या स्वतःच घेत असल्याचे दिसून आले नाही.
२. महिला मतदान करताना आपल्या घरातल्यांबरोबर, सामाजिक प्रतिष्ठित लोकांबरोबर चर्चा करतात असे म्हणाल्या पण त्या चर्चा किती अर्थपूर्ण व महिलांची राजकीय जागृती वाढवणाऱ्या असतील या बाबत शंका उत्पन्न होऊ शकते. कारण या चर्चेचा मुख्य विषय हा मतदान कोणाला करावे हाच असण्याची शक्यता आहे.
३. महिलांची ग्रामसभेस उपस्थिती ही नसल्यातच जमा आहे. त्यामुळे ग्रामसभांच्या चर्चेत त्या समावेश घेतच नाहीत. त्या चर्चेतील विषयही त्यांना फारसे माहीत नाहीत असेच दिसून येते.
४. गावातील समस्यांबाबत महिलांमध्ये जागृती दिसून आली पण त्या समस्या सोडवण्यासाठी स्वतः जाऊन ग्राम पंचायत सदस्य, सरपंचांना भेटणे या कृती करताना त्या दिसून आल्या नाहीत. अथवा या समस्या सोडवणे हे या लोकांचेच काम आहे हेही त्यांना ठाऊक नसल्याचेच जाणवले.

५. मतदान नेहमी करण्यास जात असणाऱ्या महिला या सर्व प्रकारच्या पार्श्वभूमी असणाऱ्या होत्या. त्यात शिक्षित, अशिक्षित, नोकरी करणाऱ्या, शेत मजुरी करणाऱ्या, झाडलोट करणाऱ्या, गृहिणी, शेतकरी महिला यांचा समावेश होता. पण मतदाना पलीकडे राजकारणाबाबत त्या उदासीन असल्याचेच दिसून आले.

६. महिला मतदान करतात पण त्यांना राजकीय पक्ष, त्यांची विचारप्रणाली या बाबत फार माहिती असल्याचे जाणवले नाही.

७. महिलांना लोकसभा आणि विधानसभेत आरक्षण मिळावे का ? या प्रश्नावर उत्तरदात्यांकडून (पुरुष व महिला) दोन प्रकारच्या प्रतिक्रिया उमटलेल्या आढळतात. एक म्हणजे महिला असल्यांने त्यांना आरक्षण मिळावे असे वाटते. दुसरी प्रतिक्रिया म्हणजे महिला तर आता सक्षम आहेत मग त्यांना आरक्षणाची गरजच काय आहे. या दोन्ही प्रतिक्रियांचा अभ्यास करताना असे दिसून आले की, महिलांना आरक्षण देण्यामागीचा हेतूच पुरुष तसेच महिला उत्तरदात्यांना समजल्याचे दिसून आले नाही.

८. सद्यस्थितीत सत्तेत असणाऱ्या महिला व यापूर्वी सत्तेत आलेल्या महिला या स्वतः कारभार करताना क्वचितच दिसून आल्या.

९. महिला बचत गटांच्या बैठकांमध्ये केवळ आर्थिक व्यवहारावर चर्चा झालेल्या दिसून येतात म्हणून महिला बचत गट हे राजकीय हक्क जागृतीच्या प्रक्रियेत उपयुक्त भूमिका वटवित असल्याचेआढळून आले नाही.

१०. बऱ्याचशा महिलांनी राजकारणात रसच नाही असे सांगितले आणि काहींनी राजकारण आवडते पण घरच्या जबाबदाऱ्यांमुळे जाता येत नाही असे सांगितले. म्हणजे राजकारणाची आवड असलीतरी राजकारणात सहभागी होण्यास वेळ नसल्याचे दिसून येते.

थोडक्यात भारतीय पितृसत्ताक समाजव्यवस्था आणि तिची वैशिष्ट्ये आपल्याला या गावातही दिसून येतात. महिला राजकीय सहभाग लोकशाहीतील मतदानाची संख्या वाढवण्याच्या दृष्टीने महत्वाचा बनला असला तरी राजकीय प्रक्रियेला प्रभावित करण्याच्या दृष्टीने अजूनही खूपच कमी प्रमाणात आहे. आल्मंड आणि व्हर्बा यांनी मांडलेल्या राजकीय संस्कृतीच्या प्रकारातील आज्ञांकित आणि विषयांकित राजकीय संस्कृती आपल्याला महिलांमध्ये जास्त प्रमाणात दिसून येते. आज्ञांकित राजकीय संस्कृतीत व्यक्ती आज्ञापालन करण्यावर भर देते. विषयांकित राजकीय संस्कृतीत व्यक्ती राजकीय प्रक्रियेत सहभागी होत असली तरी आपण राजकीय प्रक्रिया बदलवू शकतो, तिला प्रभावित करू शकतो याबाबत तिच्या मनात खात्री नसते. या गावातही महिलांचा राजकीय सहभाग या वरील दोन प्रवृत्तीतच फिरताना दिसून आला आहे.

संदर्भ सूची :

- भसीन कमला, (मराठी अनुवाद- श्रुती तांबे), २०१०, लिंगभाव समजून घेताना, मुंबई, लोकवाङ्मय गृह.
- पाटील भारती, २०१४, स्त्रिया : समाज आणि राजकारण, पुणे, हार्मिस प्रकाशन.
- दामले सुवर्णा, २०१८, महिला आरक्षण सत्तेच्या सोंगट्या, लोकसत्ता चतुरंग, जानेवारी ६.
- https://youtu.be/mCvpK96qqk (लोकशाहीची वाटचाल – सुहास पळशीकर व्याख्यान)

''केतकावळे गावातील भाषा आणि लोकसाहित्य यांचा अभ्यास''

डॉ. वंदना सोनवले

मराठी विभाग

प्रास्ताविक :

लोकसाहित्य म्हटले की, लोकमानसाचे विविध वाङ्मयीन, सांस्कृतिक, कलात्मक आविष्कार सूचित केले जातात. लोकसाहित्यामध्ये लोकसंस्कृतीच्या जडणघडणीतील शब्द साधने (वाच्यार्थाने मौखिक वाङ्मय) व शब्देतर साधने (रूढी, चालीरीती, पारंपरिक कला, कारागिरी, विविध प्रकारचे खेळ, ज्योतिष, वैद्यक इ.) या सर्वांचाच समावेश झालेला आहे. ही सर्व साधने लोकसंस्कृतीचा अविभाज्य भाग बनलेली आहेत. लोकसाहित्य या शब्दातील 'लोक' या पूर्वपदाचा अर्थही अनेकदा ग्रामीण, निरक्षर, जुन्या परंपरेतील असा केला जातो. लोकसाहित्य हे त्या त्या ठिकाणच्या बोलीभाषेतील असते. म्हणूनच पुरंदर तालुक्यातील केतकावळे या गावातील लोकसाहित्याचा अभ्यास करत असताना तेथील बोलीभाषेचा अभ्यास केला आहे. बोलीभाषेवरून त्या गावातील लोकसंस्कृती समजते.

संशोधन अभ्यासाची उद्दिष्टे आणि ध्येय :

केतकावळे हे गाव शिवकालापासून पुरंदर तालुक्यातील एक अत्यंत महत्त्वाचे गाव आहे. या गावाला ऐतिहासिक व सामाजिक व धार्मिक पार्श्वभूमी लाभली आहे. या गावाच्या एका बाजूला स्वराज्याचे दुसरे छत्रपती श्री संभाजीराजे यांचे जन्मस्थान असलेला पुरंदरसारखा अभेद्य किल्ला उभा आहे. गावातच प्रति बालाजीचे मंदिर आहे. त्यामुळे येथे विविध धर्माचे व विविध भाषा बोलणारे लोक या ठिकाणाला भेट देत असतात. केतकावळे गावाच्या जवळच चीवेवाडी हे छोटेसे गाव डोंगराच्या कुशीत वसलेले आहे. या गावात आदिवासी यांची लोकवस्ती आढळते. त्यामुळे केतकावळे या गावाच्या बोलीभाषेचा, लोककलांचा, लोकगीतांचा अभ्यास करणे. तसेच केतकावळे गावातील लोकांच्या म्हणी, उखाणे, वाक्यप्रचार यांचे संकलन करणे हे या अभ्यासाची उद्दिष्टे व ध्येय आहे.

अभ्यासपद्धती :

लोकसाहित्याचा अभ्यास करत असताना एकच एक अशी अभ्यासपद्धती वापरून चालत नाही. अभ्यासाच्या उद्दिष्टानुसार अभ्यासाच्या पद्धती बदलतात. लोकसाहित्याचा अभ्यास कोणत्याही उपलब्ध पुस्तकांच्या आधारे एका ठिकाणी बसून करता येत नाही तर त्यासाठी प्रत्यक्ष त्या निवडलेल्या क्षेत्रात खेड्यापाड्यात संशोधकाला फिरावे लागते. विश्वासाचे वातावरण निर्माण करावे लागते. तेव्हा मौखिक परंपरेतील अस्सल लोकसाहित्य त्यांच्याकडून बाहेर येते. मग ते संकलित करून संपादित करता येते. म्हणून केतकावळे या गावातील

बोलीभाषेचा व लोकसाहित्याचा अभ्यास करण्यासाठी क्षेत्रीय व ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर केला आहे.

तथ्य आणि विश्लेषण :

पुणे जिल्ह्यातील, पुरंदर तालुक्यातील केतकावळे या ठिकाणी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या अंतर्गत मराठी या विषयाचे सर्वेक्षण केले. संशोधकाने प्रत्यक्षात तेथे जाऊन मराठीतील लोकसाहित्याचे संकलन केले. विशेषतः केतकावळे गावातील महिलांच्या, मागच्या पिढीतील वृद्धांच्या घरोघरी जाऊन भेटी घेऊन त्यांच्याकडे असलेले उखाणे, लोकगीते यांचे संकलन केले आहे. पुरंदर तालुक्यातील केतकावळे हे ९ व्या शतकापासून अस्तित्व असलेले महत्त्वपूर्ण खेडेगाव आहे. केतकावळे हे गाव साधारणत: अडीच हजार लोकसंख्येचे आहे. या गावातील समाज, भाषा, संस्कृतीला मध्ययुगीन काळाचा समर्थ इतिहास आणि वारसा आहे. शिवकालापासून या गावात महाराष्ट्रभाषा मराठी ही मातृभाषा म्हणून बोलली जाते. भाषेच्या विकासाचा एक संपन्न आढावा त्या भाषेतील मौखिक वाङ्मयातून, लोकसाहित्यातून घेता येतो. या सर्वेक्षणादरम्यान जाणीवपूर्वक या सांस्कृतिक आणि भाषिक संपन्नतेचा मागोवा घेण्यात आला. १६ व्या १७ या शतकातील मराठी राजवटीच्या काळातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक जीवनाचा लक्षणीय संस्कार या परिसरातील बोली भूगोलावर झाल्याचे आढळते. त्यादरम्यान अनेक म्हणी, वाक्प्रचार, उखाणे, लोकगीते, लोककथा यांचे संकलन मराठी विभागाने केले. काही निवडक संकलन पुढे देत आहोत. लोकसाहित्यातील एक मौल्यवान लेणं म्हणजे उखाणा.

शंकराच्या पिंडीवर खोबऱ्याची वाटी,

.....ला बायको केली संसारासाठी

भारतात लोकगीतांची परंपरा अतिप्राचीन काळापासून प्रचलित आहे. लोकगीतांची ही परंपरा मौखिक आहे.ही लोकगीते म्हणजे लोकवाणी, मानवी जीवनावर मोजके पण मार्मिक भाष्य करण्यात कुशल असलेली, वाङ्मयानंद देणारी व समाजदर्शन घडविणारी लोकगीते मानवी जीवनाची संस्कृतीसंरक्षक म्हणून महत्त्वाची आहेत.ही लोकगीते एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होत असतात. ही लोकगीते समुहाने किंवा एक व्यक्तीसुद्धा गाऊ शकते. गाण्याच्या ओघानुसार लिहिणे इतक्या जलद गतीने होत नाही. तेव्हा यातील काही शब्द गाळण्याचा धोका असतो. परंतु आता सुदैवाने दृक श्राव्य माध्यमे, सामग्री घेऊन खेड्यापाड्यात जाता येते. मोबाईलमधूनही फोटो आणि ध्वनीसंग्रह करणे शक्य झाले आहे. त्यामुळे संशोधकाला हे संकलन प्रत्यक्ष पुरावा म्हणूनही दाखवता येते. तसेच हे संकलन संग्रहित करून ठेवणे सोपे झालेले आहे.

स्वराज्य स्थापनेच्या काळात छत्रपती शिवाजी महाराजांना लोक कलाकारांच्या लोककलांचा महत्त्वपूर्ण उपयोग झाला. जनसामान्यांचे प्रबोधन करण्यासाठी तसेच हेर खात्याच्या बातम्या पोहचवण्यासाठी वासुदेव, गोंधळी, वाघ्या मुरळी, भारुड सादर करणारे कलाकार यांचा अतिशय खुबीने महाराजांनी वापर केला. कृष्णभक्त वासुदेव आपल्या गीतातून या स्वरूपाचे प्रबोधनाचे कार्य उत्तमरीतीने करत असत. आजही ही परंपरा

समर्थपणे लोकाकलाकारांकडून केतकावळे परिसरात जपली जात आहे. आधुनिक जीवनपद्धतीचा स्वीकार करत असतानाच शिक्षण, शेती, नवीन आर्थिक व्ययसाय यांसोबतच हे कलाकार जाणीवपूर्वक आपली लोककला जोपासत आहेत.

हरी.. नाम बोला

वासुदेव आला, वासुदेव आला

विट्ठला , पंढरीच्या विठ्ठला

सोहळा तो दाटला, सोहळा तो दाटला

जनीसंगे दळताना, गायिली तू गीता

तुझ्या पिरतीचा डंका , हृदयात नाचला

सोहळा तो दाटला, सोहळा तो दाटला

हरी.. नाम बोला

वासुदेव आला, वासुदेव आला

जनाबाईंच्या भक्ती माधुर्याची गोडी वासुदेव आपल्या गीतातून पहाटेच्या प्रसंगावेळी जनसामान्यांच्या कानावर घालत आहेत. गोंधळी समजाचे कलाकार अगीनदासाच्या पोवाड्यातून तानाजी मालुसरे यांना महादेव कोळी समाजाने केलेल्या साहायचे वर्णन करीत आहेत. छत्रपती संभाजीराजे ते महाराणी ताराराणीपर्यंत स्वराज्य सांभाळणाऱ्या थोर व्यक्तींचा इतिहास आजही गोंधळ गीतांमधून ते समाजासमोर मांडत आहेत.

सारांश, मौखिक साहित्याने केवळ भ्शिक्चा नव्हे तर समाज आणि संस्कृती जतन करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य पार पडलेले आहे हे या सर्वेक्षणातून दिसून येत आहे.

निष्कर्ष :

१. पुरंदर तालुक्यातील केतकावळे हे ९ व्या शतकापासून अस्तित्व असलेले महत्त्वपूर्ण खेडेगाव आहे.

२. या गावातील समाज, भाषा, संस्कृतीला मध्ययुगीन काळाचा समर्थ इतिहास आणि वारसा आहे.

३. १६ व्या १७ या शतकातील मराठी राजवटीच्या काळातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक जीवनाचा लक्षणीय संस्कार या परिसरातील बोली भूगोलावर झाल्याचे आढळते.

४. १६ व्या शतकातील लोक कलाकारांच्या मार्फत जोपासल्या गेलेल्या लोकगीत, लोककथा, म्हणी, वाक्प्रचार इत्यादींचे भाषिक सौंदर्य आजही मौखिक परंपरेने येथील लोकसमुहाने जतन केले आहे.

५. कोरड्यास, ढवळा भात, शाळू, कडबोळे, माडग, भालाईत, बानाईत या प्रकारचे शिवकालीन शब्द त्यांच्या बोलीभाषेत आढळतात.

संदर्भ :

१. लोकसाहित्याचे उपासक , रा. चिं. ढेरे

२. लोकसाहित्याचे स्वरूप डॉ. प्रभाकर मांडे

अण्णासाहेब मगर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिराचे उदघाट्न

पुणे : प्रतिनिधी

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या अण्णासाहेब मगर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबीर केतकावळे (ता. पुरंदर) या ठिकाणी आयोजित करण्यात आले होते.

या शिबीराच्या उद्घाटन समारंभासाठी पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे उपसचिव एल. एम. पवार, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे, सरपंच मारूती भडाळे, कार्यक्रम अधिकारी डॉ. सविता डॉ. कुलकर्णी, प्रा. नितीन लगड, डॉ. अंजू मुंडे, प्रा. गौरव शेलार उपस्थित होते.

श्रमदानाच्या साहित्याच्या पूजनाने शिबीराचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना डॉ. सविता कुलकर्णी यांनी राष्ट्रीय सेवा योजनेची माहिती सांगून विशेष शिबीरामध्ये विविध उपक्रम आयोजित केल्याचे सांगितले. यामध्ये महिला सबलीकरण, विवाहपूर्व समुपदेशन, मुलींसाठी स्वसंरक्षण कार्यशाळा आयोजित केली होती.

यावर्षी शिबीराची संकल्पना 'युवकांचा ध्यास ग्राम शहर विकास' अशी असून, या संदर्भात आणि मतदान जागृती या संकल्पनेवर आधारित विविध उपक्रम आयोजिक

करण्यात येत असल्याची माहिती त्यांनी दिली. सरपंच मारूती भडाळे यांनी शिबीरातील सर्व विद्यार्थी आणि शिक्षक यांचे स्वागत केले. शिबीरातील आयोजित उपक्रमांचे त्यांनी कौतुक केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे यांनी अशा शिबीरांमध्ये सहभागी झाल्याने विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो, विविध प्रकारच्या संधी प्राप्त होतात आणि नवनवीन गोष्टी शिकायला मिळतात त्यामुळे विद्यार्थ्यांनी अशा शिबीरामध्ये सहभागी व्हावे. यानंतर प्राणायाम आणि ओंकाराचे महत्त्व सांगून त्यांच्याकडून ओंकार करवून घेतले. एकाग्रतेचे महत्त्व सांगणारी ओम ही ॲक्टीव्हीटी करून घेतली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष एल. एम. पवार यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. आणि शिबीरात सहभागी होणारे विद्यार्थी वेगळे असून, या निमित्ताने अनेक गोष्टी शिकायला मिळतात आणि ते अनुभवाने समृध्द होतात. विविध अनुभव सांगून त्यांनी अशा उपक्रमांचे आयुष्यातील महत्त्व सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. नितीन लगड यांनी, तर आभार प्रा. गौरव शेलार यांनी मानले. या कार्यक्रमाचे नियोजन डॉ. सविता कुलकर्णी, प्रा. नितीन लगड, डॉ. अंज मुंडे, प्रा. गौरव शेलार, डॉ. वंदना सोनवले, प्रा. शितल गायकवाड, प्रा. गणेश आवटे यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे यांच्या मार्गदर्शनाखाली केले.

अण्णासाहेब मगर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिराचा समारोप

पुणे : प्रतिनिधी

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या अण्णासाहेब मगर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने केतकावळे (ता. पुरंदर) येथे आयोजित शिबिराचा समारोप उत्साहात संपन्न झाला. करण्यात आला.

या समारंभासाठी यशवंत शितोळे, प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे, सरपंच मारूती भडाळे, कार्यक्रम अधिकारी डॉ. सविता कुलकर्णी, प्रा. नितीन लगड, डॉ. अंजू मुंडे, प्रा. गौरव शेलार उपस्थित होते.

प्रास्ताविक करताना रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. सविता कुलकर्णी यांनी शिबीरातील विविध उपक्रमांची माहिती दिली. यामध्ये गावामधील रस्त्यांची स्वच्छता, शाळेच्या मैदानाची स्वच्छता, सलग समपातळी चर, झाडांना रंग असे श्रमदान, मतदान जनजागृतीवर आधारीत पोस्टर, पथनाट्य आणि रॅली आयोजित केल्याचे सांगितले. गावामधील अंगणवाडीतील मुलांच्या दात आणि डोळ्यांची तपासणी, गावातील पाणी, प्राणि, वनस्पती, पिकांचा प्रकार, भाषा, गावचा इतिहास, गावातील राजकारणामधील स्त्रियांचा सहभाग, बालाजी मंदिर या धार्मिक पर्यटन स्थळाचा

गोष्टींचे सर्वेक्षण करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

श्वेता कदम आणि रामकृष्ण सुतार या विद्यार्थ्यांचा उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून आणि साने गुरूजी या गटाचा उत्कृष्ट गट म्हणून सत्कार करण्या आला. तसेच विद्यार्थी ओम शिंगोटे, रामकृष्ण सुतार, पूर्वा पात्रे, अुती भोसले यांनी मनोगत व्यक्त केले. गावातील हर्षल जगदाळे, श्री. बाठे, श्री. गोळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.यानंतर

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे यांनी राष्ट्रीय सेवा योजना हा अत्यंत सुलभ उपक्रम असून, यामधून विद्यार्थ्यांना एक व्यासपीठ मिळते आणि त्यातूनच त्यांना त्यांच्यातील उत्तम गोष्टी कळतात आणि त्या विकसित करण्याची संधी मिळते. यावेळी त्यांनी महाविद्यालयातील विविध शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी सर्वेक्षण केलेल्या विषय, त्याची उद्दीष्टे, अभ्यासपध्दती या विषयीची माहिती देणारे प्रेझेंटशेन केले. यानंतर यशवंत शितोळे यांनी गावामध्ये केलेल्या कामांची माहिती करून घेतली. आणि आपणही राष्ट्रीय सेवा योजना असल्याचे सांगितले.श्रमदान, व्याख्यान, हे करत असताना त्याचा आनंद घेतला पाहिजे असे त्यांनी सांगितले.

यावेळी शिबीराचा अहवाल मोहनराव देशमुख यांना दिला. यांनतर मोहनराव देशमुख यांनी रा.से.यो. विषयी माहिती देताना हा उपक्रम भव्य गोष्टी डोळ्यासमोर ठेवून केल्याचे सांगितले. विद्यार्थी या शिबिरामधून अनेक गोष्टी शिकतात.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. नितीन लगड यांनी, तर आभार डॉ. अंजू मुंडे यांनी मानले. महाविद्यालयाच्या वतीने डॉ. सविता कुलकर्णी, डॉ. नितीन लगड, डॉ. अंजू मुंडे, प्रा. गौरव शेलार, प्रा. गणेश आवटे यांचा सत्कार करण्यात आला.

अण्णासाहेब मगर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबीर संपन्न

पुणे : प्रतिनिधी

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या अण्णासाहेब मगर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबीर केतकावळे, ता. पुरंदर या ठिकाणी आयोजित करण्यात आले होते.

या शिबीराच्या उद्घाटनप्रसंगी पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे उपसचिव एल. एम. पवार, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे, सरपंच मारूती भडाळे, कार्यक्रम अधिकारी डॉ. सविता डॉ. कुलकर्णी, प्रा. नितीन लगड, डॉ. अंजू मुंदे, प्रा. गौरव शेलार उपस्थित होते.

या शिबिरात श्रमदान करीत गावातील रस्त्यांची स्वच्छता करण्यात आली. झाडांना रंग लावण्यात आला. शाळेचा परिसर स्वच्छ केला. शाळेच्या मैदानावर वाढलेले गवत काढले. श्रमदानामध्ये विद्यार्थ्यांनी केतकावळे गावामागील डोंगरावर पाणी अडविण्यासाठी आणि जिरविण्यासाठी चर खोदले. तसेच प्राणी आणि पक्ष्यांना पाणी पिण्यासाठी लहान लहान तळी करण्यात आली.

शिबिरकालात उत्स्फुर्त नाट्यस्पर्धा, देशभक्तीपर समुहगीत स्पर्धा, प्रसंगनाट्य, जाहिरात स्पर्धा, पाककला स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. नवमतदार नोंदणी आणि मतदानाविषयी जागृती व्हावी, या हेतूने गावामध्ये मतदान रॅली काढण्यात आली. यावेळी स्लोगन तयार करून ती देण्यात आली. मतदान जागृती या विषयावरील पोस्टर स्पर्धा आयोजित करण्यात आली. तू माझा सांगाती या शरदचंद्रजी पवार यांच्या पुस्तकाचे वाचन करण्यात आले. श्रीकांत लक्ष्मीशंकर यांचे विवाहपूर्व समुपदेशन या विषयावरील व्याख्यान, अमृता देशपांडे यांच्या महिला सबलीकरण विषयावरील व्याख्यान, विद्यार्थिनींसाठी स्वसंरक्षण कार्यशाळा आणि मूल्यशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली. गावातील महिलांची ओळख व्हावी, त्यांच्याशी संवाद साधता यावा, त्यांचे सणवार, संस्कृती या विषयीची माहिती करून घेण्यासाठी हळदी कुंकवाचे आयोजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थिनींनी उपस्थित महिलांना विडयाचे पान, सुपारी आणि तुळशीचे रोप दिले.

अण्णासाहेब मगर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिरात गाव सर्वेक्षण

पुणे : प्रतिनिधी

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या अण्णासाहेब मगर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबीर केतकावळे, (ता. पुरंदर) येथे आयोजित करण्यात आले होते. या शिबिरांतर्गत केतकावळे गावातील माती, पाणी, प्राणी, वनस्पती, शेतीच्या पद्धती, पर्यटन, भाषा, ऊर्जा वापराची माध्यमे, राजकीय इतिहास, आर्थिक सर्वेक्षण याविषयी सर्वेक्षण करण्यात आले.

रसायनशास्त्र, प्राणिशास्त्र, भौतिकशास्त्र, वनस्पतीशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र, भूगोल, पर्यटन, मराठी, अर्थशास्त्र विभागातील संबंधित विषयाचे शिक्षक आणि विद्यार्थी यांनी सहकार्य केले. रसायनशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांनी गावातील विहिरीचे, कॅनॉलचे पाणी, तसेच शेतातील मातीचे नमुने घेतले. या नमुन्यांचे विश्लेषण करून त्याचा अहवाल तयार करण्यात येणार आहे. भूगोल विभागाच्या विद्यार्थ्यांनी गावातील भौगोलिक परिस्थिती, शेतामध्ये असणारी पिके, तेथे असणारा मातीचा प्रकार याचा अभ्यास केला. भौतिकशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांनी गावामध्ये वापरल्या जाणा-या ऊर्जास्त्रोतांचा अभ्यास केला. प्राणिशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी गावातील पक्षी, प्राणी, किटक आणि तेथील भौगोलिक परिस्थिती याचा अभ्यास केला.

वनस्पतीशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी गावातील औषधी वनस्पती, तेथील शेती पध्दती, पिकांचा प्रकार, जैवविविधता या विषयाचा अभ्यास केला. पर्यटन विषयाच्या विद्यार्थ्यांनी बालाजी या पर्यटनस्थळाचा तेथील परिस्थितीवर होणारा अभ्यास केला. अर्थशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांनी गावातील शेतीक्षेत्रावर हवामान बदलाचा परिणाम अभ्यासला. मानसशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांनी गावातील शाळेतील दहावीच्या विद्यार्थ्यांची कलचाचणी घेतली.

मराठी विभागाच्या वतीने गावतील बोली भाषा, बोलण्यात येणारे इतर शब्द, ओव्या, म्हणी, गाणी यांची माहिती घेण्यात आली. यासाठी प्रा. शितल जगताप, स्नेहल शिपलकर, प्रा. तन्वी खरे, प्रा. अंजली कामशेट्टी, डॉ. शुभांगी शिंदे, प्रा. उर्मिला घनगर, प्रा. शितल गायकवाड, प्रा. शिल्पी दासगुप्ता, डॉ. अंजू मुंदे, प्रा. भावना जगताप, प्रा. शितल आर. गायकवाड, प्रा. प्रविण पोतदार, प्रा. प्रज्ञा खरात, प्रा. संगिता देवकर, डॉ. वंदना सोनवले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.